महाराष्ट्र शासन

# कला संचालनालय,

सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई ४००००१ दुरध्वनी.०२२-२२६२०२३१/३२

- 9 DEC 2020

## प्रसिध्दीपत्रक

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या नियंत्रणाखालील प्रथम वर्ष पदविका/प्रमाणपत्र कला विषयक अभ्यासक्रम १) मुलभूत अभ्यासक्रम २) ए.टी.डी. ३) आर्टमास्टर प्रमाणपत्र ४) रेखा व रंगकला, ५) उपयोजित कला , ६) शिल्पकला व प्रतिमानबंध, ७) अंतर्गत गृहसजवाट, ८). वस्त्रकाम (टेक्सटाईल्स),९) मातकाम (सिरॅमिक व पॉटरी ), १०) कला शिक्षणशास्त्र पदविका ) या १० अभ्यासक्रमांचे तात्पुरती यादी व प्रवेश प्रक्रियेचे टप्पे आणि नियोजित तारखा खालीलप्रमाणे.

| अ.क्र | प्रक्रिया | नियोजित तारखा |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांसाठी तात्पुरत्या निवड यादया प्रदर्शित करणे, | दि. ९/१२/२०२० |
| २ | सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांसाठी तात्पुरत्या निवड यादीबाबत काही तक्रार असल्यास त्या inform.doa@gmail.com या ईमेल वर सादर करणे. | दि. १०/१२/२०२० |
| ३ | विद्यार्थ्यांसाठी अंतिम निवड यादी प्रसिध्द करणे. | दि.१२/१२/२०२० |
| ४ | संबंधीत महाविद्यालयात प्रवेश घेण्याचा दिनांक (संबंधित महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे व्दिसदस्यीय समिती व्दारे तपासून व संस्थेचा प्रवेश अर्ज भरुन प्रवेश देण्यात यावेत) | दि.१४/१२/२०२० ते दि.१८/१२/२०२० |
| ५ | उर्वरित रिक्त जागांबाबत माहिती तसेच प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी inform.doa@gmail.com या ईमेल वर महाविद्यालयातील समितीने दुपारी १.०० वाजेपर्यंत सादर करावी. | दि. १९.१२.२०२० |
| ६ | विद्यार्थ्यांसाठी उर्वरित रिक्त जागेवर दुसरी निवड यादी व प्रवेश प्रक्रिया. (संबंधित महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे व्दिसदस्यीय समिती व्दारे तपासून व संस्थेचा प्रवेश अर्ज भरुन प्रवेश देण्यात यावेत) | दि.२१.१२.२०२० ते दि.२४.१२.२०२० |
| ७ | दुसरी निवड यादी व प्रवेश प्रक्रियेनंतर उर्वरित रिक्त जागेवर संस्थेच्या अधिकार समितीने नियमानुसार व गुणवत्तेनुसार (ऑनलाईन पध्दतीने फॉर्म भरलेले व न भरलेले) विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावे. व त्या विद्यार्थ्यांची नोंदणी ऑनलाईन पध्दतीने संस्था स्तरावर करण्यात यावी. तथापि, ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने फॉर्म भरला असेल, त्यांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे. ( स्पॉट ॲडमिशन नोंदणी प्रक्रिया सकाळी ११.०० ते १२.००) प्रवेश मर्यादापेक्षा जास्त प्रवेश होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. | दि.२८.१२.२०२० |
| ८ | स्पॉट ॲडमिशन नंतर प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी inform.doa@gmail.com या ईमेल वर समितीने दुपारी १.०० वाजेपर्यंत सादर करावी. | दि.३०.१२.२०२० |

टिप:- अनुक्रमांक ४,५,६,७ व ८ वरील सुचना संस्था प्रमुख व प्राचार्यांसाठी.

(भा. ना. तिखे)
प्र निरीक्षक,
चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई

(राजीव मिश्रा)
कला संचालक,
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई